


दैनिक

# प्रजाशाहीचा आवाज

RNI.MAHMAR/2024/89502

संपादक : वैभव एस.धबडगे

9822474807 /8766498503

प्रजाशाहीचा आवाज NEWS

Voice Of Democracy

बातमी जी लपवली नाही तर दाखवली जाते

www.prajashahichaawaj.in


हिंगोली येथून प्रकाशित .. | वर्ष ०२ | बुधवार २० मे २०२६ | किंमत ०२ रुपये

prajashahichaawaj@gmail.com
website : www.prajashahichaawaj.in

# मोदी तुमची ५६ इंचाची छाती फक्त देशातच फुगते?

# नॉर्वेच्या महिला पत्रकारासमोर 'विश्वगुरूंची' दातखिळी!

गोदी मीडिया सांभाळता आला, गोऱ्या पत्रकारांना कसं सांभाळणार? मोदीजी, परदेशात कॅमेऱ्यासमोर 'पाणी पिण्याची' वेळ का आली?



विशेष प्रतिनिधी / नवी दिल्ली (वृत्तसंस्था)देशातील सामान्य जनतेला महागाईच्या खाईत ढकलून, "परदेश दौरे टाळा" असा सल्लावजा उपदेश देणारे देशाचे 'विश्वगुरू' पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या परदेश दौऱ्यावर आहेत. मात्र, भारतात पत्रकारांना 'मॅनेज' करणे सोपे असले, तरी आंतरराष्ट्रीय पातळीवर लोकशाहीचा खरा आरसा कसा दाखवला जातो, याचा प्रत्यय नुकताच नॉर्वेमध्ये आला. 'प्रेस फ्रीडम इंडेक्स' (जागतिक वृत्तपत्र स्वातंत्र्य निर्देशांक) मध्ये जगात पहिल्या क्रमांकावर असलेल्या नॉर्वेमधील एका महिला पत्रकाराने जाहीरपणे उपस्थित केलेल्या एका साध्या प्रश्नाने भारतीय पंतप्रधानांची बोलतीच बंद केली."पंतप्रधान मोदी, जगातील सर्वात मुक्त प्रसारमाध्यमांकडून काही प्रश्न घेण्याचे धाडस तुम्ही का दाखवत नाही?" या महिला पत्रकाराच्या एकाच धारदार प्रश्नाने भारताच्या कथित 'मजबूत' नेतृत्वाची आंतरराष्ट्रीय स्तरावर कोंडी केली.भूतकाळातील भीती की प्रश्नांची धास्ती?भारतातील गोदी मीडियाच्या कॅमेऱ्यांसमोर केवळ स्क्रिप्टेड आणि पूर्वनियोजित मुलाखती देण्याची सवय असलेल्या पंतप्रधानांना या अनपेक्षित आणि थेट प्रश्नाने थबकायला लावले. राजकीय विश्लेषकांच्या मते, या महिला पत्रकाराला कदाचित ठाऊक नसावे की, भूतकाळात वरिष्ठ पत्रकार करण थापर यांच्या काही रोखठोक प्रश्नांमुळे तत्कालीन मुख्यमंत्र्यांना पाणी पिण्याची आणि थेट मुलाखत सोडून जाण्याची वेळ आली होती. तोच इतिहास आज आंतरराष्ट्रीय पातळीवर अधोरेखित झाला. एखाद्या लोकशाही देशात पत्रकाराने पंतप्रधानांना प्रश्न विचारणे अत्यंत सामान्य मानले जाते, मात्र भारतीय लोकशाहीच्या सर्वोच्च पदावरील व्यक्तीने या प्रश्नाला मौन बाळगून बगल देणे पसंत केले.नॉर्वे क्रमांक १ वर, भारत १५७ व्या क्रमांकाच्या गर्तेत!हा केवळ एका प्रश्नाचा भाग नाही, तर हा दोन देशांमधील लोकशाही मूल्यांमधील फरक आहे. नॉर्वे आज जगातील सर्वात मुक्त पत्रकारितेचा देश म्हणून पहिल्या क्रमांकावर विराजमान आहे, तर जगातील 'सर्वात मोठी लोकशाही' असल्याचा दावा करणारा भारत प्रेस फ्रीडम इंडेक्समध्ये थेट १५७ व्या क्रमांकावर फेकला गेला आहे.भारतात सद्यस्थिती अत्यंत भीषण आहे. परवाच पेट्रोलचे दर वाढले, व्यावसायिक गॅस सिलिंडर १००० रुपयांच्या पार गेला, महागाईने जनता होरपळत आहे. परंतु, देशातील मुख्य प्रवाहातील प्रसारमाध्यमांना जनतेच्या या प्रश्नांशी काहीही देणेघेणे उरलेले नाही. सत्ताधाऱ्यांना जाब विचारण्याऐवजी ही माध्यमे विरोधकांनाच प्रश्न विचारण्यात मग्न आहेत.प्रश्न विचारणारा 'देशद्रोही'? सत्तेचा नवा अघोषित नियम!आज भारतात जर एखाद्या प्रामाणिक पत्रकाराने (झुरळासारख्या चिरडल्या जाणाऱ्या यंत्रणेतून वर येऊन) सत्तेला जाब विचारण्याचा प्रयत्न केलाच, तर त्याला तातडीने 'विकासविरोधी', 'देशद्रोही' किंवा 'विशिष्ट पक्षाचा हस्तक' म्हणून घोषित केले जाते.टीका म्हणजे राष्ट्राला विरोध? सत्तेच्या धोरणांवर केलेली टीका म्हणजे देशाचा अपमान.असहमती म्हणजे कटकारस्थान? सरकारच्या निर्णयाशी असहमत असणाऱ्यांना थेट गुन्हेगार ठरवण्याचा नवा पायंडा पडला आहे.प्रश्न विचारणे म्हणजे गुन्हा? जनतेच्या हक्कासाठी प्रश्न विचारणे हा थेट व्यवस्थेचा अपमान मानला जात आहे.लोकशाही संविधानावर चालते, बहुमताच्या हुकूमशाहीवर नाही!लोकशाही ही केवळ निवडणुका जिंकून मिळवलेल्या बहुमतावर किंवा विरोधी पक्षाच्या कमकुवतपणावर उभी राहत नाही. लोकशाहीची खरी ताकद संविधानात, स्वतंत्र स्वायत्त संस्थांमध्ये, निष्पक्ष न्यायव्यवस्थेत आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे लोकशाहीचा चौथा स्तंभ असणाऱ्या स्वतंत्र आणि निर्भीड पत्रकारितेत असते. इतिहास साक्षी आहे, जेव्हा जेव्हा सत्तेला प्रश्न विचारणारे आवाज दडपले गेले किंवा कमजोर झाले, तेव्हा तेव्हा लोकशाहीचे रूपांतर हुकूमशाहीत झाले आहे.५६ इंचाची छाती अमेरिकेपुढे का झुकली?नॉर्वेमधील त्या महिला पत्रकाराने विचारलेला प्रश्न वैयक्तिक मोदींना नव्हता, तर तो स्वतःला जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणवणाऱ्या भारताच्या संपूर्ण व्यवस्थेला होता. आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर स्वतःची प्रतिमा मोठी करण्यासाठी धडपडणारे देशाचे नेतृत्व अमेरिकेसारख्या बलाढ्य देशांसमोर आणि तिथल्या खुल्या पत्रकारितेसमोर नेमके का कचरते? '५६ इंचाची छाती' देशातील जनतेला धाक दाखवण्यासाठी ठीक आहे, पण आंतरराष्ट्रीय स्तरावर खुल्या प्रश्नांना सामोरे जाताना ती का झुकते, असा संतप्त सवाल आता विचारला जात आहे.संपादकीय मत:लोकशाहीत कधीही सत्ता किंवा नेते मोठे नसतात; सर्वोच्च असते ते देशाचे संविधान आणि जनतेचे प्रश्न! जेव्हा सत्तेला प्रश्न विचारणे थांबवले जाते, तेव्हा लोकशाहीचा अंत सुरू होतो. नॉर्वेमधील त्या एका महिला पत्रकाराने भारताच्या 'मौन' हुकूमशाही प्रवृत्तीवर जगाच्या वेशीवर टांगलेले हे सर्वात मोठे प्रश्नचिन्ह आहे.

---

## कोकण विकायला काढलंय का?"देवाभाऊं तुम्ही महाराष्ट्राचा विकास करताय की,महाराष्ट्राची विक्री?

# "महाराष्ट्र जनतेचा की उद्योगपतींचा?

मुंबई | प्रतिनिधीकोकणातील हिरव्यागार भूमीवर आता विकासाच्या नावाखाली विनाशाचे सावट गडद होताना दिसत आहे. राज्य सरकारने रिलायन्स, अदानी, एनटीपीसी आणि इतर मोठ्या उद्योगसमूहांसोबत अणुऊर्जा प्रकल्पांसाठी सामंजस्य करार करताच संपूर्ण कोकणात संतापाची लाट उसळली आहे. "हा प्रकल्प जनतेसाठी की उद्योगपतींच्या तिजोरीसाठी?" असा थेट सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत.सरकारकडून तब्बल हजारो मेगावॅट वीजनिर्मिती, लाखो रोजगार आणि विकासाची स्वप्ने दाखवली जात आहेत. मात्र वास्तवात स्थानिकांच्या डोक्यावर विस्थापन, पर्यावरणीय संकट आणि जीविताचा धोका टांगणीला लागला आहे. समुद्रकिनारी वसलेली गावे, शेतजमिनी, आंबा-काजू बागा आणि मासेमारी व्यवसाय यांचा बळी देऊन हा "कॉर्पोरेट विकास" उभारला जाणार असल्याची भीती व्यक्त होत आहे."देश कोणाचा? जनतेचा की अदानी-अंबानींचा?"राज्यातील विरोधक आणि पर्यावरणवादी संघटनांनी या निर्णयावर जोरदार टीका केली



आहे."सरकार महाराष्ट्र चालवतंय की उद्योगपतींच्या इशाऱ्यावर काम करतंय?" असा संतप्त प्रश्न आंदोलक विचारत आहेत. सामान्य शेतकरी कर्जामुळे आत्महत्या करत असताना हजारो कोटींचे प्रकल्प मात्र थेट उद्योगसमूहांच्या झोळीत टाकले जात असल्याचा आरोप होत आहे.अणुऊर्जा प्रकल्प म्हणजे केवळ वीजनिर्मिती नाही, तर भविष्यातील भीषण धोका असल्याचे जाणकार सांगतात. एखादी दुर्घटना घडल्यास तिचे परिणाम पिढ्यानपिढ्या भोगावे लागू शकतात. मात्र सरकारकडून यावर ठोस हमी किंवा सुरक्षेचा स्पष्ट आराखडा जनतेसमोर ठेवण्यात आलेला नाही.रोजगाराचे गाजर, पण स्थानिकांचे काय?प्रकल्पांमधून लाखो रोजगार निर्माण होतील, असे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात स्थानिक युवकांना किती संधी मिळणार याबाबत कोणतीही स्पष्टता नाही. मोठे प्रकल्प आले की बाहेरच्या कंपन्या, बाहेरचे कंत्राटदार आणि बाहेरचे कामगार येतात; स्थानिक मात्र स्वतःच्या जमिनी गमावून हातावर पोट ठेवण्याची वेळ येते, असा पूर्वानुभव कोकणवासीय मांडत आहेत.पर्यावरणाचा बळीकोकण हे जैवविविधतेने समृद्ध क्षेत्र मानले जाते. समुद्र, डोंगर, जंगल आणि शेती यांचा समतोल राखणाऱ्या या भागात अणुऊर्जा प्रकल्प उभारल्यास पर्यावरणीय संकट निर्माण होण्याची शक्यता तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. उष्ण पाणी समुद्रात सोडल्याने मत्स्यसंपदा धोक्यात येऊ शकते, तर किरणोत्सर्गाचा धोका वेगळाच."विकास" की "विक्री"?सरकार "विकास" म्हणत असले तरी जनतेमध्ये आता एकच चर्चा सुरू आहे—"महाराष्ट्राचा विकास होतोय की महाराष्ट्र विकला जातोय?"कोकणातील जनतेने आता या निर्णयाविरोधात रस्त्यावर उतरण्याची तयारी सुरू केली असून, येत्या काळात मोठे आंदोलन उभे राहण्याची शक्यता आहे. "आमची जमीन, आमचा समुद्र, आमचा हक्क" अशी भूमिका घेत स्थानिकांनी सरकारला थेट इशारा दिला आहे.

---

# संपादकीय

## "मोदीजी तुम्ही भारतीय गोदी कॅमेऱ्यांत शेर मुक्त पत्रकारितेसमोर का झाले मौन?"

"प्रश्नांना घाबरणारे 'विश्वगुरू' आणि गप्प बसलेली लोकशाही!"सत्तेच्या चमकदार प्रचारामागचं भीषण वास्तव आता जगासमोर उघडं पडतंय...भारताला "विश्वगुरू" बनवण्याच्या घोषणा देणारे पंतप्रधान नरेंद्र मोदी देशात जरी टाळ्यांच्या आवाजात आणि गोदी मीडियाच्या मखमली मुलाखतींमध्ये स्वतःची प्रतिमा रंगवत असले, तरी आंतरराष्ट्रीय पत्रकारितेच्या कठोर आरशासमोर ती प्रतिमा किती काचेची आहे, हे नॉर्वेमधील एका महिला पत्रकाराच्या प्रश्नाने उघड करून दाखवलं."तुम्ही मुक्त पत्रकारितेकडून प्रश्न घेण्याचं धाडस का करत नाही?"हा प्रश्न फक्त मोदींना नव्हता... तो भारताच्या लोकशाहीला होता.आणि दुर्दैवाने, त्या प्रश्नाचं उत्तर भारताच्या मौनात हरवलं.देशात पत्रकार परिषद घेण्याची हिंमत नसलेले पंतप्रधान परदेशात लोकशाहीचे धडे देतात, हीच आजची सर्वात मोठी विडंबना आहे. गेल्या अनेक वर्षांत एकही खुली पत्रकार परिषद न घेणाऱ्या नेतृत्वाला देशातील बेरोजगारी, महागाई, शेतकरी आत्महत्या, मणिपूर हिंसा, पेपरफुटी, महिला सुरक्षा यावर थेट प्रश्न विचारले गेले तर उत्तर द्यावं लागेल — आणि कदाचित याच भीतीने "स्क्रिप्टेड राष्ट्रवाद" उभारला गेला.देशात मात्र वेगळंच चित्र आहे.इथे प्रश्न विचारणारा पत्रकार "देशद्रोही" ठरतो.सरकारवर टीका करणारा नागरिक "अर्बन नक्षल" ठरतो.आणि सत्तेला आरसा दाखवणाऱ्या माध्यमांवर ईडी, सीबीआय, आयकर विभाग यांची सावली पडते.लोकशाहीत माध्यमं ही सत्तेची दलाली करण्यासाठी नसतात; ती जनतेच्या प्रश्नांची वकिली करण्यासाठी असतात. पण भारतात आज माध्यमांचा मोठा वर्ग जनतेच्या वेदना विसरून फक्त सत्तेच्या पीआर एजन्सीसारखा वागताना दिसतो. पेट्रोल १२० पार गेलं, गॅस सिलिंडर सामान्यांच्या आवाक्याबाहेर गेला, बेरोजगारीने तरुणांची स्वप्नं चिरडली — पण टीव्हीवर चर्चा होते ती फक्त विरोधकांच्या कपड्यांवर, वक्तव्यांवर आणि धर्माच्या राजकारणावर!ज्या देशात पत्रकाराला प्रश्न विचारण्यासाठी धैर्य लागतं, त्या देशात लोकशाही धोक्यात असते — हा इतिहासाचा निर्विवाद नियम आहे.नॉर्वे प्रेस फ्रीडम इंडेक्समध्ये पहिल्या क्रमांकावर आहे, कारण तिथे पत्रकार सरकारला घाबरत नाहीत. भारत १५७ व्या क्रमांकावर आहे, कारण इथे सरकारला पत्रकार घाबरतात. हा फरक फक्त आकड्यांचा नाही; तो लोकशाहीच्या आत्म्याचा आहे."५६ इंचाची छाती" हा फक्त निवडणूक प्रचाराचा संवाद ठरला आहे का?कारण देशात विरोधकांवर गर्जणारे नेतृत्व परदेशात पत्रकारांच्या एका थेट प्रश्नासमोर शांत होतं, तेव्हा ती शांतता केवळ वैयक्तिक अस्वस्थता नसते; ती लोकशाहीच्या कमकुवत होत चाललेल्या धमन्यांची चाहूल असते.आज भारतात सर्वात मोठा प्रश्न हा नाही की मोदींनी उत्तर दिलं का नाही.सर्वात मोठा प्रश्न हा आहे की —देशात आता प्रश्न विचारण्याचं स्वातंत्र्य उरलं आहे का?कारण ज्या दिवशी जनता प्रश्न विचारणं थांबवते, त्या दिवशी लोकशाहीचा अंत सुरू होतो...

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या कुलगुरुपदी डॉ.प्रवीण वक्ते

छत्रपती संभाजीनगर, दि.१८ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या प्रकुलगुरुपदी 'केमिकल टेक्नॉलॉजी' विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ.प्रवीण वक्ते यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ही नियुक्ती करण्यात आली.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे प्रकुलगुरुपद ४ मार्च २०२६ पासून रिक्त होते. या पदाच्या नियुक्तीसाठी व्यवस्थापन परिषदेची तातडीचे बैठक मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या अध्यक्षतेखाली सोमवारी (दि.१८) दुपारी १२ वाजता आयोजित करण्यात आली. बैठकीस कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर यांच्यासह व्यवस्थापन परिषदेचे सन्मानीय १५ सदस्य प्रत्यक्ष तर चार सदस्य ऑनलाईनरित्या उपस्थित होते. बैठकीत प्रशासनाच्यावतीने पुर्णवेळ प्रकुलगुरुपदासाठीचा प्रस्ताव प्रशासनाच्या वतीने मांडण्यात आला. मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्यासह सर्व सदस्यांनी डॉ.प्रवीण श्रीधरराव वक्ते यांची या पदावर नियुक्ती करण्यास मान्यता दिली. महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम २०१४ कलम १३ (६) अन्वये ही नियुक्ती करण्यात अली. डॉ.प्रवीण वक्ते हे गेल्या २७ वर्षांपासून केमिकल टेक्नॉलॉजी विभागात अध्यापन, संशोधन कार्य करीत आहेत. यापुर्वी ६ ऑगस्ट २०१९ ते २८ ऑक्टोबर २०२० या काळात त्यांनी प्रभारी प्रकुलगुरु म्हणून काम केले आहे. तसेच श्री संतपीठ पैठणचे समन्वयक, 'आयपीआर' सेलचे संचालक, खरेदी समिती सदस्य, अधिसभा, विद्या परिषद, व्यवस्थापन परिषद सदस्य, परीक्षा मंडळ, सिफार्टचे संचालक, बजाज इन्क्यूबूशनचे संचालक, नवोप्रक्रम मंडळ संचालक, अधिष्ठाता मंडळाचे सदस्य सचिव आदी पदांवर कार्य केले आहे. मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या हस्ते डॉ.वक्ते यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. यावेळी डॉ.प्रशांत अमृतकर यांची उपस्थिती होती. महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषदेचे तज्ज्ञ सदस्य म्हणूनही ते कार्यरत आहेत. त्यांना पेटंटही प्राप्त असून शहरातील गजानन मंदिर ट्रस्टचे ते अध्यक्ष आहेत. प्रकुलगुरुपदाचा अनुभव डॉ.प्रवीण वक्ते यांनी सुमारे सव्वा वर्षे प्रभारी प्रकुलगुरु म्हणून उत्तम रितीने काम सांभाळले आहे. या काळात महाविद्यालयांचे शैक्षणिक व प्रशासकीय अंकेक्षण (ट्रिपल ए) उत्तम रितीने करण्यात आले. तसेच सध्या ते अधिष्ठाता मंडळाचे सदस्य म्हणूनही कार्यरत होते. आता मात्र त्यांची पूर्णवेळ प्रकुलगुरु म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सुमारे ३२ महिन्यांचा कार्यकाळ त्यांना मिळणार आहे.

## तीर्थक्षेत्र विकासकामे दर्जेदार सुविधांसह कालमर्यादित पूर्ण करा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### महाराष्ट्रातील विविध तीर्थक्षेत्रे, गडकिल्ले आणि ऐतिहासिक स्थळांच्या विकासासाठी 993 कोटींच्या कामांना मान्यता

मुंबई,दि.18, राज्यातील ऐतिहासिक आणि धार्मिक स्थळांच्या जतन व संवर्धनास शासनाचे प्राधान्य असून तीर्थक्षेत्र विकास आराखड्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. तसेच भाविक-पर्यटकांसाठी अत्याधुनिक सोयी सुविधासह आरोग्यसुविधाची उपलब्धता करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. यावेळी शिखर समितीच्या बैठकीत सहा तीर्थक्षेत्र विकासासाठी एकूण 993.72 कोटी रुपयांच्या विकास आराखड्यांना आणि निधीला मंजुरी देण्यात आली. सह्याद्री अतिथीगृह येथे विविध तिर्थक्षेत्र विकास आराखडा शिखर समितीची बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे,उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार,वनमंत्री गणेश नाईक, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले,आमदार दिलीप वळसे पाटील, आमदार धनंजय मुंडे, मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्यासह सर्व संबंधित अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकासासाठी 172 कोटींची तरतुद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, श्री क्षेत्र भीमाशंकर ज्योतिर्लिंग क्षेत्राच्या सर्वांगीण आणि शाश्वत विकासासाठी कामे करावीत. या विकास आराखड्याअंतर्गत अत्याधुनिक बस स्थानक आणि पार्किंग सुविधा करण्यात यावी. या कामांसाठी जागांचे भूसंपादन वेळेत करावे. या प्रकल्पासाठी सुमारे १७२.२२ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे मे २०२७ पर्यंत काम पूर्ण करावे. वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी विविध वळण रस्ते आणि रस्ते रुंदीकरणाची कामे हाती घेण्यात यावीत. सध्या २.७ मीटर रुंदी असलेले रस्ते ७ मीटरपर्यंत रुंद करावा. भक्त आणि पर्यटकांच्या सुविधांसाठी मंदिर परिसरात




पादचारी मार्ग, कव्हर्ड कॉरिडॉर, फ्लोअरिंग आणि एम्फीथिएटर, २५७ केएलडी क्षमतेचा सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प, नवीन पोलीस स्टेशन आणि विश्रामगृह, भविष्यातील विकास आराखड्यांतर्गत डिंभे धरण परिसरात सबस्टेशन उभारणे, केबल कार (रोपवे) सुविधा सुरू करणे, एमटीडीसीच्या भीमाशंकर रिसॉर्टचा विकास करणे, राजापूर येथे नव्या पर्यटन सुविधांची निर्मिती करण्याचे नियोजन काटेकोरपणे करावे. आमदार बाबाजी काळे यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकास आराखड्यात सूचना केलेल्या कामांचा आराखड्यात समावेश करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी केल्या. संत तुकाराम महाराज जन्मस्थानाच्या संवर्धनासाठी 41 कोटींची तरतूद संत तुकाराम महाराज यांचे देहू येथील जन्मस्थान, वैकुंठगमन मंदिर परिसर तसेच भंडारा डोंगर परिसराच्या संवर्धन आणि विकासासाठी सर्वंकष आराखडा 41.71 कोटींचा आहे. या आराखड्यात संत तुकाराम महाराज जन्मस्थान मंदिर, वैकुंठगमन स्थळ, भंडारा डोंगर आणि परिसरातील इतर धार्मिक व ऐतिहासिक स्थळांचे संवर्धन करावे. यामध्ये रस्त्यांचे सुशोभीकरण, स्वच्छता व्यवस्था, पिण्याच्या पाण्याच्या सुविधा, पार्किंग व्यवस्था, भाविकांसाठी निवास सुविधा तसेच माहिती केंद्र उभारणे, भंडारा डोंगर परिसरात हरित क्षेत्र संवर्धन, वृक्षारोपण आणि नैसर्गिक सौंदर्य अबाधित ठेवण्यासाठी उपाययोजना करण्यात याव्यात. आमदार सुनिल शेळके यांनी संत तुकाराम महाराज जन्मस्थानाच्या संवर्धन आराखड्यात सूचविलेल्या कामांचा आराखड्यात समावेश करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. किल्ले अजिंक्यतारा जतन आणि संवर्धनासाठी 134.80 कोटींची तरतुद सातारा जिल्ह्यातील ऐतिहासिक किल्ले अजिंक्यताराचे जतन, संवर्धन आणि परिसर सुशोभीकरणासाठी 134.80 कोटी रूपयांचा विकास आराखडा आहे. यामध्ये नियोजित असलेल्या पायाभूत सुविधांचा विकास, नियोजित प्रेक्षक गॅलरी, नवे पादचारी मार्ग व लँडस्केपिंग,राज सदरेचे पुनरुज्जीवन, बुरूजांचे संवर्धन, पर्यटन आकर्षणे,अत्याधुनिक लटकता पूल,स्वच्छता व विश्रांती गृहांची कामे, तज्ज्ञांचे मार्गदर्शनाखाली नियोजित कामे वेळेत पार पाडावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. संगम माहुली (सातारा) समाधी स्थळ संवर्धन प्रकल्पासाठी 133 कोटींची तरतुद संगम माहुली समाधीस्थळ संवर्धनासाठी 133 कोटी रूपयांची तरतूद करण्यात आली आहे. याअंतर्गत महाराणी ताराबाई, महाराणी येसूबाई आणि छत्रपती शाहू महाराज यांच्या समाधी स्थळांचा जीर्णोद्धार आणि लँडस्केप विकास केला जाणार आहे. याशिवाय, ऐतिहासिक संगमेश्वर मंदिर व घाटाचे संवर्धन, नवीन हँगिंग ब्रिज (झुलता पूल), व्ह्यूइंग गॅलरी आणि सुसज्ज पाथवेची निर्मिती करून या परिसराला जागतिक दर्जाचे पर्यटन स्थळ बनविण्यात येईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली. श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास आराखडा (वेरुळ)साठी 210 कोटी रूपयांची तरतुद छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वेरुळ येथील प्रसिद्ध घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग मंदिराच्या विकासासाठी सुधारित आराखडा तयार करण्यात आला आहे. या प्रकल्पाची एकूण किंमत आता 210.45 कोटी रुपये प्रस्तावित करण्यात आली असून, यामध्ये 53.82 कोटींच्या वाढीव निधीची मागणी समाविष्ट आहे. सध्या या ठिकाणी भाविकांसाठी अत्याधुनिक भक्त निवास, दर्शन बारी (प्रतीक्षागृह), शॉपिंग कॉम्प्लेक्स, फंक्शन हॉल, घाट आणि १.६ किमीचा बाह्य वळण रस्ता (बायपास रोड) यांसारखी कामे गतीने करावीत, असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसर विकासासाठी 301.54 कोटींची तरतुद 'श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर' परिसर मूळ आराखड्यातील पुढील नवीन कामांसाठी सुमारे 301.54 कोटी रुपयांचा अतिरिक्त आराखडाही तयार करण्यात आला आहे. तीन टप्प्यात या मंदिराची कामे वेळेत पूर्ण करावीत. पहिला टप्पा (मुख्य मंदिर परिसर) विकासामध्ये भव्य प्रवेशद्वारे, डिजिटल रांग व्यवस्था, प्रतीक्षागृहे, अन्नछत्र, योग-ध्यान केंद्र आणि मंदिर परिसराचे सौंदर्यीकरण,दुसरा टप्पा (तीर्थ व पुरातन स्थळे): हरिहर व मार्कंडेय तीर्थांचे वैज्ञानिक पुनरुज्जीवन, घाट, सायकल ट्रॅक, दिव्यांगसुलभ सुविधा, फूड कोर्ट आणि सीसीटीव्ही सुरक्षा व्यवस्था उभारणे. तिसरा टप्पा (मेरू पर्वत विकास) मेरू पर्वतावर भव्य शिवमूर्ती, शिवपुराण व वैदिक संग्रहालय, ॲम्फीथिएटर, लेझर लाईट अँड साऊंड शो आणि ध्यानस्थळे विकसित करा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. पुण्याचे जितेंद्र डुडी जिल्हाधिकारी यांनी श्री क्षेत्र भीमाशंकर आदर्श गाव विकास आराखडा व संत तुकाराम महाराज जन्मस्थान संवर्धन विकास आराखड्याचे सादरीकरण केले. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी श्री क्षेत्र घृष्णेश्वर ज्योतिर्लिंग विकास आराखडा व श्री क्षेत्र परळी वैजनाथ ज्योतिर्लिंग मंदिर परिसर विकास आराखड्याचे सादरीकरण केले. किल्ले अजिंक्यतारा जतन आणि संवर्धन व संगम माहुली (सातारा) समाधी स्थळ संवर्धन आराखडाचे सादरीकरण साताऱ्याचे जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी सादर केले.

## पांडुरंग नवटके यांची वसमत विधानसभा अंतर्गत 'सिरळी' बूथवर BLA-2 म्हणून नियुक्ती

वसमत (हिंगोली): आगामी काळातील राजकीय घडामोडी आणि पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याच्या हेतूने भारतीय जनता पार्टीने (B J P) तळागाळातील कार्यकर्त्यांना जबाबदाऱ्या देण्यास सुरुवात केली आहे. याच पार्श्वभूमीवर, ९२-वसमत विधानसभा मतदारसंघातील सिरळी येथील बूथ क्रमांक ४३ वर श्री. पांडुरंग गंगाधर नवटके यांची BLA-2 (बूथ लेव्हल एजंट-२) या पदावर अधिकृत नियुक्ती करण्यात आली आहे.भारतीय जनता पार्टीचे नेते आणि 'कपीश्वर


भारतीय जनता पार्टी
आतिश जयप्रकाश दांडेगावकर
नियुक्तीपत्र

साखर कारखाना लि., बाराशीव, वसमत' चे अध्यक्ष आतिश जयप्रकाश दांडेगावकर यांच्या स्वाक्षरीने हे नियुक्तीपत्र जारी करण्यात आले आहे.वरिष्ठांच्या प्रेरणेतून आणि नेतृत्वाखाली नियुक्तीया नियुक्तीपत्रात नमूद केल्यानुसार, भारताचे लोकप्रिय पंतप्रधान माननीय श्री. नरेंद्रजी मोदी, महाराष्ट्राचे लाडके उपमुख्यमंत्री माननीय श्री. देवेंद्रजी फडणवीस, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष माननीय श्री. चंद्रशेखर बावनकुळे (पत्रातील संदर्भावरून), तसेच जिल्हाध्यक्ष माननीय श्री. गजाननजी घुगे यांच्या सक्षम नेतृत्वाखाली आणि प्रेरणेने ही नियुक्ती करण्यात आली आहे.कार्यकौशल्याची घेतली दखलश्री. पांडुरंग गंगाधर नवटके यांची पक्षाप्रती असलेली निष्ठा, त्यांचे कार्यकौशल्या, नेतृत्वगुण आणि संघटन कौशल्य विचारात घेऊन पक्षाने त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे. "या नवीन जबाबदारीच्या माध्यमातून आपण पक्षाची संघटनात्मक उभारणी अधिक बळकट कराल, समाजातील सर्व घटकांपर्यंत पक्षाची विचारधारा पोहोचवाल आणि सेवा, समर्पण व विकासाच्या माध्यमातून जनतेचा विश्वास अधिक दृढ कराल, अशी आम्हाला खात्री आहे."शुभेच्छांचा वर्षावया नियुक्तीबद्दल आतिश जयप्रकाश दांडेगावकर (BLA 1, वसमत विधानसभा प्रमुख) यांनी पांडुरंग नवटके यांना त्यांच्या पुढील वाटचालीस आणि पक्षकार्यास मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या आहेत. या नियुक्तीमुळे सिरळी आणि परिसर भागातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण असून, नवटके यांच्यावर सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मोशीतील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहात प्रवेश प्रक्रिया सुरू

पिंपरी-चिंचवड : मोशी परिसरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहामध्ये शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अंतर्गत चालणाऱ्या या वसतिगृहात विविध अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांसाठी प्रवेश उपलब्ध करून देण्यात येणार आहे.यावर्षी इयत्ता अकरावीपासून पदवी व व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर रिक्त जागा उपलब्ध असून, पात्र विद्यार्थ्यांना शासनाच्या



नियमानुसार प्रवेश दिला जाणार आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती-भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग, इतर मागासवर्ग तसेच दिव्यांग आणि अनाथ विद्यार्थ्यांसाठी आरक्षणानुसार सुविधा देण्यात येणार आहेत.प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन, अभ्यासासाठी आवश्यक साहित्य, ग्रंथालय, इंटरनेट सुविधा, अभ्यासिका तसेच व्यायामासाठी जिमची सुविधाही उपलब्ध करून दिली जाणार आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी वसतिगृह प्रशासनाकडून विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.इच्छुक विद्यार्थी व पालकांनी सामाजिक न्याय विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन ऑनलाइन अर्ज सादर करावेत, असे आवाहन प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

## मराठवाडा पदवीधर मतदार संघासाठी हिंगोलीचे मा. दिलीपराव घुगे यांची मराठवाडा समन्वयकपदी नियुक्ती



हिंगोली | प्रतिनिधीमराठवाडा पदवीधर मतदार संघासाठी हिंगोलीचे मा. दिलीपराव घुगे यांची मराठवाडा समन्वयकपदी नियुक्ती झाल्याबद्दल आज दि. 19 मे रोजी हिंगोली येथे त्यांचा सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. शिवसेना जिल्हाप्रमुख मा. श्री. संदेशभाऊ देशमुख यांच्या हस्ते शाल, पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.यावेळी बोलताना मान्यवरांनी दिलीपराव घुगे यांच्या सामाजिक व संघटनात्मक कार्याचा गौरव करत, मराठवाडा पदवीधर मतदार संघात त्यांच्या नियुक्तीमुळे संघटन अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच आगामी काळात त्यांनी प्रभावीपणे जबाबदारी पार पाडून पदवीधरांच्या प्रश्नांना न्याय मिळवून द्यावा, अशा शुभेच्छाही देण्यात आल्या.या कार्यक्रमास प्रदेश संघटक, शेतकरी सेना वसिमभाई देशमुख, चेअरमन अविनाश खांडेकर तसेच शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इतर मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी दिलीपराव घुगे यांचे अभिनंदन करून पुढील राजकीय व सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

व्हॉट्सॲप अंक मिळणेसाठी
9822 474 807
वर संपर्क करा!

# किनवटमध्ये हायप्रोफाईल जुगार अड्ड्यावर पोलिसांचा छापा;

## माजी शिक्षणाधिकारी, पत्रकारासह ९ जण गजाआड४ लाख २३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त; दत्तनगरातील पत्र्याच्या शेडमध्ये रंगेहात कारवाई

दैनिक प्रजाशाहीचा आवाज | सतिश घुले

किनवट प्रतिनिधीकिनवट तालुक्यातील दत्तनगर, गोकुंदा परिसरात सुरू असलेल्या कथित हायप्रोफाईल जुगार अड्ड्यावर किनवट पोलिसांनी टाकलेल्या धडक छाप्यामुळे संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे या कारवाईत एक सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी, पत्रकार आणि काही नामांकित व्यापाऱ्यांचा समावेश असल्याने "कायद्याचे धडे देणारेच कायद्याच्या जाळ्यात" अशी चर्चा नागरिकांमध्ये रंगली आहे.पोलिसांनी शनिवारी (१६ मे) सायंकाळी सुमारे ७:३५ वाजता दत्तनगर येथील गौतम बेलाजी येरेकर यांच्या घरासमोरील टीन पत्र्याच्या शेडवर छापा टाकत 'तिरट' नावाचा जुगार खेळणाऱ्या ९ जणांना रंगेहात पकडले. या कारवाईत रोकड, महागडे मोबाईल, दुचाकी वाहने आणि पत्त्यांचा संच असा तब्बल ४ लाख २३ हजार ९०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.पोलीस सूत्रांच्या माहितीनुसार, किनवट पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेका १२३९ गजानन मल्लिकार्जुन वेरुळकर व त्यांच्या पथकाने गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई केली. पोलिसांच्या धाडीत आरोपी पैसे लावून जुगार खेळताना आणि इतरांना खेळवताना आढळून आले. अटक करण्यात आलेले आरोपीनागोराव गंगाराम



रापणवार, आनंदराव सखाराम वाढे, असद खान मेहबूब खान, राम जयराम राठोड, सुरेश पांडुरंग माने, अनिल मारुती कराळे, दत्ता उद्धव कसबे, दाऊद सुलेमान चव्हाण आणि गौतम बेलाजी येरेकर यांना पोलिसांनी अटक केली आहे. याप्रकरणी पोहेका गजानन वेरुळकर यांच्या फिर्यादीवरून किनवट पोलीस ठाण्यात गु.र.नं. १०४/२०२६ अंतर्गत महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार कलम १३(अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पीएसओ लेखुळे यांनी रात्री १०:३९ वाजता गुन्ह्याची नोंद केली असून पुढील तपास हेड कॉन्स्टेबल मेंडके करीत आहेत."प्रतिष्ठा मोठी की कायदा?" — नागरिकांचा सवालया कारवाईनंतर किनवट शहरात अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. समाजात प्रतिष्ठित म्हणून वावरणारे काही लोकच जर अशा अवैध धंद्यांमध्ये सहभागी होत असतील, तर सामान्य नागरिकांनी कोणाकडे आदर्श म्हणून पाहायचे? शिक्षणक्षेत्राशी संबंधित व्यक्ती आणि पत्रकार यांची नावे समोर आल्याने सामाजिक जबाबदारीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.पत्रकारिता ही समाजाला दिशा देणारी आणि अन्यायाविरोधात आवाज उठवणारी भूमिका मानली जाते. मात्र, अशा गंभीर गुन्ह्यात पत्रकाराचे नाव समोर आल्याने "पत्रकारितेच्या नावाखाली नेमके सुरू काय आहे?" असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.पोलिसांची कारवाई की केवळ दिखावा?गेल्या काही महिन्यांपासून किनवट तालुक्यात मटका, जुगार आणि इतर अवैध धंदे खुलेआम सुरू असल्याच्या तक्रारी होत होत्या. स्थानिक नागरिकांच्या मते, पोलिसांना सर्व माहिती असूनही अनेकदा कारवाई होत नसल्याची भावना होती. मात्र आता अचानक झालेल्या या मोठ्या कारवाईमुळे पोलिसांनी कठोर भूमिका घेतल्याचे चित्र निर्माण झाले आहे.तरीही प्रश्न असा आहे की, इतक्या मोठ्या प्रमाणावर सुरू असलेला जुगार अड्डा पोलिसांच्या नजरेआड इतके दिवस कसा राहिला? या अवैध धंद्यांना राजकीय किंवा आर्थिक पाठबळ तर नव्हते ना? अशा चर्चांना आता उधाण आले आहे."बेकायदेशीर धंदे सहन केले जाणार नाहीत"पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, तालुक्यातील जुगार, मटका आणि इतर अवैध धंद्यांविरोधात यापुढेही कठोर कारवाया सुरू राहतील. "गुन्हेगारांची प्रतिष्ठा किंवा पार्श्वभूमी न पाहता थेट कायदेशीर कारवाई केली जाईल," असे त्यांनी स्पष्ट केले.जिल्हा पोलीस अधीक्षकांच्या आदेशानुसार सुरू असलेल्या या विशेष मोहिमेमुळे सध्या अवैध धंदे चालविणाऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, किनवट पोलिसांच्या या कारवाईने अनेकांचे धाबे दणाणले आहेत.

## तरुणांच्या स्वाभिमानासाठी 'कॉकरोच जनता पार्टी'ची स्थापना
## अभिजित दिपके यांची उपरोधिक आंदोलनाची अनोखी हाक




हिंगोली प्रतिनिधी
अजित दिपके

------------------------

संतुक पिंपरी ता. जि. हिंगोली येथील युवक अभिजित दिपके यांनी "कॉकरोच जनता पार्टी" नावाची उपरोधिक संघटना स्थापन करून सध्या सोशल मीडियावर मोठी चर्चा निर्माण केली आहे. बेरोजगार तरुणांबाबत झालेल्या कथित वक्तव्याच्या निषेधार्थ त्यांनी हा अनोखा उपक्रम सुरू केला असून, देशभरातील युवकांकडून त्याला विविध प्रकारच्या प्रतिक्रिया मिळत आहेत.१५ मे २०२६ रोजी भारताचे सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी बेरोजगार तरुणांच्या संदर्भात केलेल्या कथित विधानामुळे देशभरात वाद निर्माण झाला होता. काही माध्यमांमध्ये बेरोजगार तरुणांची तुलना 'कॉकरोच' आणि 'परजीवी' यांच्याशी केल्याचे वृत्त समोर आले होते. मात्र, नंतर त्यांनी स्पष्टीकरण देत आपला रोख फक्त बनावट पदव्या घेणाऱ्या व्यक्तींवर असल्याचे स्पष्ट केले.या संपूर्ण प्रकरणानंतर संतुक पिंपरी येथील युवक अभिजित दिपके यांनी तरुणांच्या भावना व्यक्त करण्यासाठी "कॉकरोच जनता पार्टी"ची स्थापना केल्याची घोषणा सोशल मीडियावर केली. या नावामागे उपरोधात्मक संदेश असून, "तरुणांचा अपमान सहन केला जाणार नाही" असा सूर त्यांनी आपल्या पोस्टमधून व्यक्त केला आहे.अभिजित दिपके यांनी सोशल मीडियावर पोस्ट, व्हिडिओ आणि घोषणांच्या माध्यमातून बेरोजगारी, शिक्षण व्यवस्था, स्पर्धा परीक्षा आणि युवकांच्या समस्यांवर भाष्य करण्यास सुरुवात केली आहे. त्यांच्या या उपक्रमाला काही जणांकडून पाठिंबा मिळत असून, तर काहींनी हा प्रकार केवळ प्रसिद्धीसाठी असल्याची टीकाही केली आहे. मात्र, अल्पावधीतच "कॉकरोच जनता पार्टी" हा विषय फेसबुक, इंस्टाग्राम आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर चर्चेचा विषय ठरला आहे.विशेष म्हणजे, या पक्षाच्या नावातून तरुणांच्या नाराजीचा आवाज मांडण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे समर्थकांचे म्हणणे आहे. "बेरोजगारी, स्पर्धा परीक्षा आणि युवकांच्या संघर्षाकडे गंभीरपणे लक्ष देण्याची गरज आहे," असे मत अनेक तरुणांनी व्यक्त केले.दरम्यान, या उपरोधिक आंदोलनामुळे हिंगोली जिल्ह्यातील संतुक पिंपरी गाव पुन्हा एकदा चर्चेत आले असून, अभिजित दिपके यांच्या या अनोख्या प्रयोगाकडे राज्यभरातील युवकांचे लक्ष लागले आहे.

## नांदेड विधान परिषद स्थानिक प्राधिकार मतदारसंघ निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर
## 18 जून रोजी मतदान ; जिल्ह्यात आदर्श #आचारसंहिता लागू, प्रशासन सज्ज



नांदेड , दि. 19 मे : भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेच्या नांदेड स्थानिक प्राधिकार मतदारसंघाच्या द्वैवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला असून, त्यानुसार जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक आणि शांततेत पार पाडण्यासाठी प्रशासन पूर्णतः सज्ज असल्याची माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल कर्डिले यांनी दिली. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आज जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठक कक्षात पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राजकुमार माने यांच्यासह विविध माध्यमांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार, निवडणुकीची अधिसूचना २५ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १ जून २०२६ असून, अर्जांची छाननी २ जून रोजी करण्यात येईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ४ जून २०२६ निश्चित करण्यात आली आहे.या निवडणुकीसाठी मतदान १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत होणार असून, मतमोजणी २२ जून २०२६ रोजी करण्यात येणार आहे.जिल्ह्यातील स्थानिक प्राधिकारी संस्थांच्या प्रतिनिधींमधून या मतदारसंघासाठी मतदान होणार आहे. सध्या मतदारसंघात एकूण १७ कार्यरत स्थानिक प्राधिकारी संस्था असून, मतदारांची संख्या ४३२ इतकी आहे. अंतिम यादीपर्यंत या संख्येत वाढ होण्याची शक्यता असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. या निवडणुकीसाठी मतदान केंद्राची संख्या 8 राहणार असून, नांदेड जिल्ह्यातील सर्व उप विभागाच्या मुख्यालयी तहसिल कार्यालयात प्रत्येकी एक मतदान केंद्र राहणार आहे.

यावेळी उपजिल्हाधिकारी (निवडणूक) राजकुमार माने यांनी नांदेड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ विधान परिषद निवडणूक, मतदार यादी विशेष सखोल पुनरिक्षण (S I R ) कार्यक्रम २०२६ बाबत सविस्तर माहिती दिली. मतदार नोंदणी, दुरुस्ती आणि पडताळणी प्रक्रियेबाबत आवश्यक ती कार्यवाही सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. दरम्यान, निवडणूक प्रक्रियेदरम्यान आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सर्व संबंधितांना केले. आचारसंहितेचा भंग होणार नाही, याची दक्षता राजकीय पक्ष, स्थानिक संस्था आणि प्रशासनाने घ्यावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

## टाकळगव्हाण येथे यश उर्फ टायगर नागराज पावडे यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

प्रतिनिधी :
नागराज पावडे

------------------------

टाकळगव्हाण येथे यश उर्फ टायगर नागराज पावडे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात आणि जल्लोषपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले होते. मित्रपरिवार, नातेवाईक आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून टायगर यांना




शुभेच्छांचा वर्षाव केला.या वाढदिवस सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून बबनराव सोनवणे (मेंबर, जवळा बाजार) तसेच सोनाजी कदम (जवळा बाजार) यांनी उपस्थित राहून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी अशु पाटील, नागराज पाटील तसेच मित्र परिवाराने यश उर्फ टायगर यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.कार्यक्रमादरम्यान केक कापून वाढदिवस साजरा करण्यात आला. उपस्थितांनी फटाक्यांची आतषबाजी व घोषणाबाजी करत आनंदोत्सव साजरा केला. कार्यक्रमाची सांगता सर्व उपस्थितांसाठी आयोजित करण्यात आलेल्या स्नेहभोजनाने करण्यात आली.यावेळी सामाजिक सलोखा आणि मित्रत्वाचे वातावरण पाहायला मिळाले. वाढदिवसानिमित्त अनेकांनी टायगर यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.तसेच प्रजाशाहीचा आवाज न्यूज चॅनल तर्फेही यश उर्फ टायगर नागराज पावडे यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

## विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळ थांबवा;
## युवक कॉँग्रेसचे जिल्हाधिकारी कार्यालयावर निवेदन



परभणी : National Eligibility cum Entrance Test (NEET) परीक्षेतील कथित पेपरफुटी, अनियमितता आणि विद्यार्थ्यांवरील अन्यायाच्या निषेधार्थ युवक कॉँग्रेसच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर निवेदन देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी सुरू असलेला खेळ तात्काळ थांबवून दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.युवक कॉँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, देशातील लाखो विद्यार्थी वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी दिवस-रात्र मेहनत घेतात. मात्र NEET परीक्षेमध्ये सातत्याने समोर येणाऱ्या पेपरफुटी, गुणांतील विसंगती आणि परीक्षा व्यवस्थेतील त्रुटींमुळे विद्यार्थ्यांमध्ये असुरक्षितता व नैराश्य निर्माण झाले आहे. त्यामुळे शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत असल्याची भावना व्यक्त करण्यात आली.यावेळी NEET प्रकरणाची स्वतंत्र उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कठोर फौजदारी कारवाई करावी, परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक व सुरक्षित करावी आणि विद्यार्थ्यांचा शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास पुनर्स्थापित करावा, अशी मागणीही करण्यात आली.हे आंदोलन युवक कॉँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष शिवराज दादा मोरे . अखिल भारतीय युवक कॉँग्रेस महासचिव तथा प्रभारी महाराष्ट्र प्रदेश व कॉँग्रेस अजय जी चिकारा . परभणी युवक कॉँग्रेस प्रभारी भगवानराव पंडागळे यांच्या आदेशावरुन करण्यात आले या वेळी सचिन जवंजाळ पाटील यांच्या नेत्रत्वात आंदोलन व निवेदन दिले या वेळ ळी जि.प. सदस्य अजिद दादा वरपुडकर ,सुहास पंडीत ,मयुर मोरे ,अमोल डाखोरे,राजपाल देशमुख,डिगांबर खरवडे ,गोविंद झाडे,गोविंद चोपडे ,गोविंद शर्मा,दत्ता कदम ,कुणाल गायकवाड व इतर पदाधिकारी उपस्थीत होते

## देशमुखवाडी-सायलवाडी येथे चक्रीवादळाचा तडाखा;
## अनेक घरांचे नुकसान, महिला गंभीर जखमी

अर्धापूर प्रतिनिधी
एकनाथ कांबळे

------------------------

अर्धापूर तालुक्यातील देशमुखवाडी-सायलवाडी परिसरात आज आलेल्या अचानक चक्रीवादळामुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून संपूर्ण गावात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. जोरदार वाऱ्यामुळे अनेक घरांवरील पत्रे उडून गेली तर वीज वितरणाचे चार पोल कोसळल्याने गावातील विद्युत पुरवठा पूर्णपणे खंडित झाला आहे.या नैसर्गिक आपत्तीत देशमुखवाडी येथील रेणुका दिपक खंदारे (वय 26) या महिलेला गंभीर दुखापत झाली आहे. चक्रीवादळादरम्यान त्यांच्या डोक्यावर दगड पडल्याने त्या



गंभीर जखमी झाल्या असून त्यांना पुढील उपचारासाठी नांदेड येथे हलविण्यात आले आहे. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली.चक्रीवादळाच्या तडाख्यामुळे गावातील सुमारे 90 टक्के घरांवरील पत्रे उडून गेली आहेत. त्यामुळे अनेक कुटुंबे उघड्यावर आली असून नागरिकांना निवाऱ्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. विशेषतः लहान मुले, महिला आणि ज्येष्ठ नागरिकांचे मोठे हाल होत आहेत.या आपत्तीत लक्ष्मण डुकरे, जयवंतराव देशमुखे, जांबुवंतराव खंदारे, साहेबराव देशमुखे, सखाराम डवरे, संदीप देशमुखे यांच्यासह अनेक ग्रामस्थांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. शेतातील साहित्य, घरगुती वस्तू तसेच जनावरांच्या निवाऱ्यांचेही नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे.दरम्यान, घटनेनंतर अद्याप प्रशासनाकडून कोणतीही ठोस मदत मिळाली नसल्याची खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. पंचनामे करून तातडीने मदत जाहीर करावी, वीजपुरवठा पूर्ववत करावा तसेच नुकसानग्रस्तांना तात्पुरता निवारा उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.चक्रीवादळामुळे गावातील परिस्थिती गंभीर बनली असून नागरिकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेचे वातावरण पसरले आहे.

# वसमतमध्ये शक्तीपीठ महामार्गाविरोधात शेतकऱ्यांचा एल्गार “जमीन आमच्या हक्काची, नाही कोणाच्या बापाची”

वसमत प्रतिनिधी — नागपूर-गोवा शक्तीपीठ महामार्गाविरोधात हिंगोली जिल्ह्यातील वसमत येथे शेतकऱ्यांनी भव्य एल्गार मोर्चा काढत सरकारविरोधात तीव्र संताप व्यक्त केला. वडिलोपार्जित सुपीक जमीन, हळद, ऊस आणि केळीच्या बागा वाचवण्यासाठी हजारो शेतकरी, महिला व नागरिक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते. संपूर्ण परिसर घोषणांनी दणाणून गेला होता.या मोर्चामध्ये रिपब्लिकन पक्षाचे प्रदेशाध्यक्ष दिनेश हनुमते यांनी सरकार व प्रशासनावर जोरदार टीका केली. शेतकरी अनेक महिन्यांपासून आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत, मात्र सरकारने याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केल्याचा आरोप त्यांनी केला. “शेतकऱ्यांचा आवाज ऐकला जात नाही. सरकार मुके आणि बहिरे झाल्यासारखे वागत आहे,” असा घणाघात त्यांनी केला.महामार्गासाठी होणाऱ्या भूसंपादनामुळे हजारो एकर सुपीक जमीन बाधित होणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष आहे. या जमिनीवर अनेक




कुटुंबांचा उदरनिर्वाह अवलंबून असून हळद, ऊस, केळी यांसारख्या नगदी पिकांचे मोठ्या प्रमाणात उत्पादन घेतले जाते. महामार्गामुळे शेती उद्ध्वस्त होईल आणि शेतकरी आर्थिक संकटात सापडतील, अशी भीती आंदोलकांनी व्यक्त केली.मोर्चादरम्यान अनेक शेतकऱ्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सरकारकडे न्यायाची मागणी केली. काही शेतकऱ्यांनी रक्ताने पत्र लिहून मुख्यमंत्र्यांकडे इच्छामरणाची मागणी केल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. “आमच्या हक्काची जमीन हिरावून घेऊ नका, अन्यथा आम्हाला जगण्याचा अधिकार तरी द्या,” अशी हतबल भावना आंदोलकांनी व्यक्त केली.बळजबरीने भूसंपादन करण्याचा प्रयत्न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही शेतकरी संघटनांनी दिला. आत्मदहनासारखे टोकाचे पाऊल उचलण्याची वेळ सरकारने आणू नये, असा इशारा आंदोलनकर्त्यांनी प्रशासनाला दिला.मोर्चामध्ये विविध शेतकरी संघटना, सामाजिक कार्यकर्ते, महिला व युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. “शक्तीपीठ महामार्ग रद्द झालाच पाहिजे” आणि “आम्ही आमची एक इंचही जमीन देणार नाही” अशा घोषणांनी वसमत शहर दणाणून गेले.

---

## वैराग नगरपंचायतीचा ५ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा...

बार्शी प्रतिनिधी
राहुल भालशंकर

[प्रशासकीय सेवेत निवड झालेल्या विद्यार्थ्यांसह आदर्श माता, आरोग्य सेविका व महिला सफाई कर्मचाऱ्यांचा गौरव]वैराग : वैराग नगरपंचायतीच्या ५ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार सोहळा सोमवार दि. १८ मे २०२६ रोजी सकाळी ११:३० वाजता शहाजीराव पाटील सांस्कृतिक भवन येथे उत्साहात पार पडला.या कार्यक्रमात प्रशासकीय सेवेत निवड झालेले विद्यार्थी, आदर्श माता, नगरपंचायत कर्मचाऱ्यांची शैक्षणिक क्षेत्रात यश संपादन केलेली मुले, आरोग्य सेविका, आशा गट प्रवर्तक, आशा स्वयंसेविका तसेच नगरपंचायतीतील महिला सफाई कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला. याचबरोबर सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातील १०१ दिव्यांग बांधवांना निधी वाटप करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. निरंजन भूमकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून श्रीमती रेखाताई भूमकर, माजी जिल्हा परिषद सदस्य, श्री. अशोक वरदाने, माजी ग्रामपंचायत सदस्य तसेच श्री. आयुब पठाण, सेवानिवृत्त दुकाने निरीक्षक उपस्थित होते.प्रशासकीय



सेवेत निवड झालेल्या नामदेव धोकटे (पोलीस उपनिरीक्षक), प्राची गोवर्धन (कृषी अधिकारी), अजित चुंगे, महेश सुतार, अमित खेंदाड, विक्रम स्वामी, बाळासाहेब खेंदाड, धीरज स्वामी तसेच डॉ. सुरभी कासार यांचा विशेष सत्कार करण्यात आला.तसेच विविध क्षेत्रात कर्तृत्व गाजविणाऱ्या आदर्श मातांचा गौरव करण्यात आला. नगरपंचायत कर्मचाऱ्यांच्या दहावी-बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचाही सत्कार करण्यात आला.आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या आरोग्य सेविका, आशा गट प्रवर्तक व आशा स्वयंसेविकांचा सन्मान करण्यात आला.
नगरपंचायतीतील महिला सफाई कर्मचाऱ्यांना साडी वाटप करून त्यांचा गौरव करण्यात आला.सत्कारमूर्तींना फेटा, शाल, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.या कार्यक्रमाला नगराध्यक्षा सुजाता डोळसे, महिला व बालकल्याण सभापती जयश्री घोडके, पाणीपुरवठा व जलनिस्सारण सभापती अजयकुमार काळोखे, आरोग्य व दिवाबत्ती सभापती अक्षय ताटे, नगरसेवक नागनाथ वाघ, आनंद घोटकर तसेच नगरसेविका, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बौद्ध धम्म संस्कार अंगीकृत करण्यासाठी दहा दिवसीय श्रामणेर शिबिर २२ मे रोजी पुण्यात सुरू होणार इच्छुकांनी सहभागी होण्याचे आवाहन

पुणे : बौद्ध धम्माच्या प्रचार-प्रसारासाठी तसेच युवकांमध्ये नैतिकता, शिस्त आणि धम्म शिक्षणाची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या दहा दिवसीय श्रामणेर शिबिराचा भव्य दीक्षा समारंभ शुक्रवार दि. २२ मे २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता बोधिवन बुद्ध विहार, वाडेगाव वाडेबोल्हाई, पुणे येथे संपन्न होणार आहे.या विशेष शिबिरात अनेक युवक श्रामणेर दीक्षा घेऊन बुद्ध, धम्म आणि संघाच्या मार्गावर प्रवास सुरू करणार आहेत. कार्यक्रमासाठी बौद्ध भिक्खू संघ, विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर तसेच धम्मप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली आहे.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पूज्य भदंत डॉ. नागबोधी महास्थवीर हे राहणार असून उपाध्यक्ष म्हणूनही त्यांचे मार्गदर्शन लाभणार आहे. शिबिराचे प्रमुख प्रशिक्षक म्हणून पूज्य भदंत धम्मसारजी कार्य पाहत आहेत.दीक्षा समारंभाचे उद्घाटन डॉ. वृपाली सुरेंद्र रणधीर (प्राचार्या, नेस वाडिया कॉलेज ऑफ कॉमर्स) यांच्या हस्ते होणार आहे. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मा. सरजेराव वाघमारे (अध्यक्ष, विजय रणस्तंभ भीमा कोरेगाव), मा. बी. जी. घाटे साहेब (अध्यक्ष, भा. बौ. महासभा पुणे जिल्हा पूर्व), बौद्धाचार्य मा. सिद्धार्थ गायकवाड, मा. जितीन कांबळे साहेब, मा. वासनिक साहेब तसेच मा. दीपक माने उपस्थित राहणार आहेत.यावेळी विविध पूज्य भिक्खूंचीही विशेष उपस्थिती लाभणार असून त्यामध्ये पूज्य भदंत बुद्ध घोष थेरो, पूज्य भदंत धम्मधर थेरो, पूज्य भदंत सुमंगल, पूज्य भदंत मिलिंद, पूज्य भदंत धम्मरक्षित, पूज्य भदंत पय्यारक्षित, पूज्य भदंत धम्मानंद, पूज्य भदंत यश, पूज्य भदंत थिथधम्मो, पूज्य भदंत एस प्रियांदर्शी, पूज्य भदंत बुद्धपुषण आणि पूज्य भदंत धम्म बोधी यांचा समावेश आहे.भिक्खू संघ आणि भीम तरुण मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शिबिरादरम्यान श्रामणेर संघास नाश्ता व भोजनदान देऊन पुण्य संपादन करण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.भोजनदान व नाश्ता देण्यासाठी इच्छुकांनी भदंत डॉ. नागबोधी महास्थवीर (मो. ९८५०३२७०४०) किंवा भदंत सचितबोधी (मो. ९३५९२४२३८२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## सामान्य जनतेच्या हक्कासाठी युवा नेतृत्वाचा; पुढाकार हदगाव तहसीलदारांना कृष्णा पाटील यांच्या सूचना



हदगाव: शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यासाठी तालुक्यातील अपंग, वृद्ध आणि निराधार नागरिकांना अनेक फेऱ्या माराव्या लागत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. या पार्श्वभूमीवर, सर्वसामान्यांचा आवाज बुलंद करत खासदार नागेश पाटील आष्टीकर यांचे सुपुत्र कृष्णा पाटील यांनी आज हदगाव तहसील कार्यालय गाठले. तेथे त्यांनी अत्यंत आक्रमक भूमिका घेत प्रशासकीय विलंबाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आणि माननीय तहसीलदार यांना जनतेची कामे वेळेत पूर्ण करण्याचे आदेशवजा सूचना दिल्या.प्रमुख मागण्या आणि आक्रमक भूमिकेमागील कारणे:बैठकीदरम्यान कृष्णा पाटील यांनी प्रशासकीय कारभारातील त्रुटींवर बोट ठेवत खालील प्रमुख मुद्द्यांवर तहसीलदारांचे लक्ष वेधले:निराधार आणि वृद्धांच्या मानधनाचा प्रश्न: संजय गांधी निराधार योजना, श्रावणबाळ योजना यांसारख्या अत्यंत महत्त्वाच्या योजनांचे अर्ज प्रलंबित असल्यामुळे वृद्ध आणि हतबल नागरिकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. हे अर्ज विनाविलंब मंजूर व्हावेत.अपंगांची ससेहोलपट थांबवा: दिव्यांग व्यक्तींना दाखले किंवा विविध दाखल्यांच्या पडताळणीसाठी शासकीय कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागत आहेत. त्यांना कार्यालयात सन्मानाची वागणूक मिळून त्यांची कामे प्राधान्याने व्हावीत.सर्वसामान्यांची रखडलेली कामे: शेतकरी, मजूर आणि सर्वसामान्य जनतेची सातबारा, जात प्रमाणपत्र, उत्पन्न प्रमाणपत्र यांसारखी महसूल विभागाशी संबंधित कामे वेळेत पूर्ण झालीच पाहिजेत."शासकीय योजना या सर्वसामान्य, गरीब आणि गरजू जनतेसाठी असतात. जर त्यांनाच या योजनांचा लाभ घेण्यासाठी चपला झिजवाव्या लागत असतील, तर हे अजिबात सहन केले जाणार नाही. हदगाव तहसील कार्यालयाने आपली कार्यपद्धती सुधारावी आणि जनतेची कामे वेळेत पूर्ण करावीत, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल."— कृष्णा पाटील (युवा नेते)तहसीलदारांचे आश्वासन:कृष्णा पाटील यांच्या आक्रमक भूमिकेनंतर माननीय तहसीलदार हदगाव यांनी या विषयाची गंभीर दखल घेतली. कार्यालयातील प्रलंबित अर्जांचा तातडीने निपटारा केला जाईल आणि अपंग, वृद्ध व निराधारांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, याची संपूर्ण खबरदारी घेतली जाईल, असे आश्वासन त्यांनी याप्रसंगी दिले.यावेळी कृष्णा पाटील यांच्यासोबत स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. कृष्णा पाटील यांच्या या धडक भूमिकेमुळे हदगाव तालुक्यातील जनतेमधून समाधान व्यक्त होत असून, रखडलेल्या कामांना आता गती मिळेल अशी आशा निर्माण झाली आहे.